MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

ई मेल- edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२६८८६

संकेतस्थळ- www.mcaer.org

जा.क्र.मकृप/शिक्षण-१/३३२६/७२५/३०६१ दि.२२/०९/२०२६

वाचा : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. मकृप/शिक्षण-१/३३२६/६७६/२८५३, दि.०४/०९/२०२६

## परिपत्रक

**विषय : पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रकिया २०२६-२७ अंतर्गत दि.२२/०९/२०२६ रोजी आयोजित तिसरी प्रवेश फेरी तात्पुरती स्थगित करणेबाबत...**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सन २०२६-२७ करिता प्रवेश माहिती पुस्तिकेत नमूद कार्यपद्धतीप्रमाणे तिसरी प्रवेश फेरी कृषी महाविद्यालय, पुणे येथे दि.२१/०९/२०२६ व दि.२२/०९/२०२६ या कालावधीत कृषी परिषद कार्यालयाचे दि.०४/०९/२०२६ रोजीच्या परिपत्रकातील वेळापत्राकानुसार राबविण्यात येत आहे.

याअंतर्गत, दि.२२/०९/२०२६ रोजी नियमित कार्यपद्धतीप्रमाणे मुदतीत प्रवेश अर्ज दाखल केलेल्या आणि अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट असलेल्या अप्रवेशित उपस्थित उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. मात्र सदर प्रवेश फेरीबाबत काही विद्यार्थ्यांनी हरकती घेतल्याने आज दि.२२/०९/२०२६ रोजीची प्रवेश फेरी तात्पुरती स्थगित करण्यात येत आहे.

याअनुषंगाने, पुढील वेळापत्रक १५ दिवसांच्या कालावधीत जाहिर करण्यात येईल. कृपया, सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार व इतर संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

22-9

**(राहुल महिवाल)**
**महासंचालक**

**प्रतः-**

(१) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली यांना माहितीस्तव.

(२) मे.विबास टेक्नोलॉजी, पुणे यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

(३) मे.ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे यांना सुचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे. तसेच सर्व संबंधितांना व महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे.

(४) सहयोगी अधिष्ठाता तथा अध्यक्ष, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया (तिसरी प्रवेश फेरी), कृषि महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे यांना माहितीस्तव.

D:/Admn-2024-25/PG/letters